**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.७९४/एसएम-२ दिनांक ०१ डिसेंबर, २०२३

**मान्यता पत्र**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
**इन्स्पायर फाऊंडेशन,**
**८०६, महादेव नगर, जोशीवाडी, शिरूर,**
**ता.शिरूर, जि.पुणे.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र..

**इन्स्पायर फाऊंडेशन शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे संचलित ॲपेक्स इंटरनॅशनल स्कूल, गट नं.५०१/३, मौ.चऱ्होली बु.,ता.हवेली जि.पुणे**

**संदर्भ-** १. इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.७९४/एसएम-२, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२
२.इरादा पत्र (शुध्दीपत्रक) क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.७९४/एसएम-२, दि.०७.०२.२०२३

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **इन्स्पायर फाऊंडेशन शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे संचलित ॲपेक्स इंटरनॅशनल स्कूल, गट नं.५०१/३, मौ.चऱ्होली बु., ता.हवेली, जि.पुणे प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सीबीएसई)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून **इन्स्पायर फाऊंडेशन शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे संचलित ॲपेक्स इंटरनॅशनल स्कूल, गट नं.५०१/३, मौ.चऱ्होली बु., ता.हवेली, जि.पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सीबीएसई)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी, अटीं व शर्तीसह संदर्भाधिन इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पुढील अटीं व शर्तीच्या अधीन राहून मान्यता पत्र देण्यात येत आहे.

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

**(विवेक सपकाळ)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत-**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे.
७. निवडनस्ती (एसएम-२)

शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४ ज.रा.कु./मान्यता/पुवि/२०२३/ 12974
दिनांक : - 15 DEC 2023

प्रति,
अध्यक्ष, / सचिव इन्स्पायर फाऊंडेशन शिरुर, ता. शिरुर जि पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून (इ.१ ली ते १२ वी सर्व शाखा इंग्रजी माध्यम) सीबीएसई संलग्नित नवीन शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत. इन्स्पायर फाऊंडेशन शिरुर, ता. शिरुर जि पुणे संचलित अ‍ॅपेक्स इंटरनॅशनल स्कूल,गट नं.५०१/३, मौ.च-होली बु ता.हवेली जि पुणे

संदर्भ : १ श्री.विवेक सपकाळ,कार्यासन अधिकारी,, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांचेकडील शासन आदेश क्रमाक एसएफएस-१०२२/प्र क्र ७९४/एसएम-२ दिनांक १.१२.२०२३
२ अध्यक्ष सचिव, इन्स्पायर फाऊंडेशन शिरुर, ता. शिरुर जि पुणे यांचे पत्र दिनांक ५.१२.२०२३ या कार्यालयास प्राप्त दिनांक ७.१२.२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत इन्स्पायर फाऊंडेशन शिरुर, ता. शिरुर जि पुणे संचलित अ‍ॅपेक्स इंटरनॅशनल स्कूल,गट नं.५०१/३, मौ.च-होली बु ता.हवेली जि पुणे इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा सीबीएसई संलग्नित प्राथमिक ते उच्च माध्यमिक इंग्रजी माध्यम शाळेस संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात नमूद असलेनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून संदर्भीय क्र. १ चे शासन आदेश मधील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
१. श्री विवेक सपकाळ, कार्यासन अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई-३२
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे